SAMPLE CONTENT

*Pathway to your Exam Success*

Exam Experts

# SSC BOARD SOLVED PAPERS



# मराठी अक्षरभारती

- Board Papers / Activity Sheets from March 2020 to July 2024 with detailed solutions
- Time management guide to optimize performance

**Std. X**
**ENGLISH MEDIUM**

**Ace your exam with SSC Exam Topper's Answer Sheet**

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४ यांच्या **अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यावर** आधारित

Exam Experts

2020 to 2024

# SSC

# BOARD SOLVED PAPERS

# मराठी अक्षरभारती

## (English Medium)

**ठळक वैशिष्ट्ये**

- **बोर्ड कृतिपत्रिका आणि उत्तरपत्रिका**
  - मार्च 2020 ते जुलै 2024 च्या सर्व बोर्ड कृतिपत्रिका समाविष्ट
  - बोर्ड कृतिपत्रिकांच्या सविस्तर उत्तरपत्रिका
- **वेळेचे नियोजन व गुण विभागणी सहीत कृतिपत्रिकेचा आराखडा**
  - कृतिपत्रिकेचा आराखडा व वेळेच्या प्रभावी नियोजनाचे मार्गदर्शन.
- **बोर्ड परीक्षा टॉपरची उत्तर पत्रिका**
  - बोर्ड परीक्षेत उत्तम कामगिरीसाठी प्रेरणादायी

टॉपर्सची उत्तरपत्रिका डाऊनलोड करण्यासाठी सोबतचा QR कोड स्कॅन करा.

बोर्ड मॉडरेटर्सच्या विशेष टीप्स चा व्हिडिओ पाहण्यासाठी सोबतचा QR कोड स्कॅन करा.

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

P.O. No. 14715

**TEID: 4236**

Sample Content

## प्रस्तावना

SSC 10 वी बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा. दहावीच्या वर्षात पदार्पण केल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात ताण, भीती, निराशा, परीक्षेपर्यंत मनोबल कसे टिकवून ठेवावे अशा विविध भावनांची आंदोलने सुरू असतात आणि यावर मात करून यश मिळवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे वेळेचे प्रभावी नियोजन आणि सातत्याने केलेला सराव.

या आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी वर्षानुवर्षे चालत आलेला खात्रीशीर मार्ग म्हणजे, मागील वर्षांचे बोर्ड परीक्षांचे पेपर्स सोडवणे. यामुळे बोर्डाच्या प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, प्रश्न विचारण्याच्या पद्धती, गुण पद्धती यांचे योग्य आकलन होते व आत्मविश्वास वाढून एवढ्या महत्त्वाच्या परीक्षेला सामोरे जाण्याची भीती हळूहळू कमी होऊ लागते.

विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची ही भीता कमी करून, त्यांचा आत्मविश्वास वाढवून परीक्षेचा अधिकाधिक सराव होण्याच्या उद्देशाने आम्ही टार्गेट चे **'SSC BOARD SOLVED PAPERS: मराठी अक्षरभारती'** हे पुस्तक प्रकाशित करत आहोत. या पुस्तकात बोर्ड प्रश्नपत्रिकांचा अद्ययावत आराखडा आणि प्रभावी वेळेच्या नियोजनाचे मार्गदर्शन समाविष्ट आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्न पद्धती योग्यरित्या समजून, जास्तीत जास्त गुण मिळवण्यास मदत होईल.

या पुस्तकात मार्च 2020 ते जुलै 2024 च्या सर्व बोर्ड कृतिपत्रिका समाविष्ट केलेल्या आहेत. ज्यामुळे सध्या बोर्डाच्या कृतिपत्रिकेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचा कल विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल. या सर्व कृतिपत्रिकांच्या सुयोग्य उत्तरपत्रिका सविस्तर उत्तरांसह देण्यात आल्या आहेत. ज्यामुळे विद्यार्थी आत्मविश्वासाने आपल्या बोर्ड परीक्षांची पूर्वतयारी करू शकतील. याशिवाय या पुस्तकाचे, आणखी एक महत्त्वाचे आणि अनोखे वैशिष्ट्य म्हणजे, टॉपर्स उत्तरपत्रिका Q.R. कोडद्वारा उपलब्ध करण्यात आली आहे. या आदर्श उत्तरपत्रिकेमुळे उत्तरे कशी लिहावीत, आणि जास्तीत जास्त गुण मिळवण्यासाठी उत्तरांची रचना, उत्तरातील महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करणे इ. चा अचूक वापर कसा करावा ते विद्यार्थ्यांना समजेल.

टार्गेट चे **' SSC BOARD SOLVED PAPERS: मराठी अक्षरभारती'** हे पुस्तक तुमचे बोर्ड परीक्षांचे गुण वाढवून देण्यात निश्चितच उपयुक्त ठरेल आणि यांचा सराव करून या परीक्षेत उत्तम यश तुम्ही संपादन कराल याची आम्हांला खात्री आहे.

**बोर्ड परीक्षेच्या मन:पूर्वक शुभेच्छा!**

**यशस्वी भव !**

प्रकाशक

**आवृत्ती:** प्रथम

हे पुस्तक सर्वोत्कृष्ट करण्यासाठी आम्ही सर्वतोपरि प्रयत्न केले आहेत; तरी ते अधिकाधिक परिपूर्ण व्हावे यासाठी आपल्या प्रतिक्रिया, सूचना स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय: mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textual contents published by Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| मराठी अक्षरभारती | | | |
|---|---|---|---|
| अनु. क्र. | विषय | पृष्ठ क्र. | |
| 1 | कृतिपत्रिकेचा आराखडा व वेळेचे नियोजन | 1 | |
| | | कृतिपत्रिका | उत्तरपत्रिका |
| 2 | बोर्ड कृतिपत्रिका : मार्च 2020 | 3 | 9 |
| 3 | बोर्ड कृतिपत्रिका : नोव्हेंबर 2020 | 18 | 24 |
| 4 | बोर्ड कृतिपत्रिका : 2021 | **[टीप:** ही परीक्षा कोविड-19 मुळे घेण्यात आली नाही.**]** | |
| 5 | बोर्ड कृतिपत्रिका : मार्च 2022 | 34 | 40 |
| 6 | बोर्ड कृतिपत्रिका : जुलै 2022 | 49 | 55 |
| 7 | बोर्ड कृतिपत्रिका : मार्च 2023 | 64 | 71 |
| 8 | बोर्ड कृतिपत्रिका : जुलै 2023 | 81 | 87 |
| 9 | बोर्ड कृतिपत्रिका : मार्च 2024 | 96 | 102 |
| 10 | बोर्ड कृतिपत्रिका : जुलै 2024 | 110 | 116 |


Sample Content

Sample Content

# कृतिपत्रिकेचा आराखडा व वेळेचे नियोजन

| विभाग 1 | गद्य |
|---|---|

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| **प्र.1.** | **अ.** | **पठित गद्य** | | |
| | 1. | आकलन कृती | 02 गुण | 15 मिनिटे |
| | 2. | आकलन कृती | 02 गुण | |
| | 3. | स्वमत | 03 गुण | |
| | | | **7 गुण** | |
| **प्र.1.** | **आ.** | **पठित गद्य** | | |
| | 1. | आकलन कृती | 02 गुण | 15 मिनिटे |
| | 2. | आकलन कृती | 02 गुण | |
| | 3. | स्वमत | 03 गुण | |
| | | | **7 गुण** | |
| **प्र.1.** | **इ.** | **अपठित गद्य** | | |
| | 1. | आकलन कृती | 02 गुण | 10 मिनिटे |
| | 2. | आकलन कृती | 02 गुण | |
| | | | **4 गुण** | |

| विभाग 2 | पद्य |
|---|---|

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| **प्र.2.** | **अ.** | **पठित पद्य** | | |
| | 1. | आकलन कृती | 02 गुण | 15 मिनिटे |
| | 2. | आकलन कृती | 02 गुण | |
| | 3. | कवितेतील शब्दांचा अर्थ लिहिणे (कोणतेही चार) | 02 गुण | |
| | 4. | काव्यसौंदर्य | 02 गुण | |
| | | | **8 गुण** | |
| | | | **एकूण गुण** | **वेळेचे नियोजन** |
| **प्र.2.** | **आ.** | **पठित पद्य** | | |
| | 6 पैकी 5 कृती देण्यात येतील. | | | 15 मिनिटे |
| | 1. | कवी/कवयित्री | 01 गुण | |
| | 2. | कवितेचा विषय | 01 गुण | |
| | 3. | सरळअर्थ | 02 गुण | |
| | 4. | संदेश | 02 गुण | |
| | 5. | कविता आवडण्याची / न आवडण्याची कारणे | 02 गुण | |
| | 6. | शब्दांचा अर्थ लिहिणे (कोणतेही चार शब्द दिले जातील.) | 02 गुण | |
| | | | **8 गुण** | |

| विभाग 3 | स्थूलवाचन |
|---|---|

| | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|
| **प्र.3.** | **स्थूलवाचनावर आधारित कृती** | | |
| | 3 पैकी 2 कृती सोडविणे आवश्यक स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित 3 कृती देणे व त्यांपैकी 2 सोडवणे अपेक्षित | **06 गुण** | 20 मिनिटे |

Sample Content

| विभाग 4 | भाष्याभ्यास |
|---|---|

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| प्र.4. | अ. | **व्याकरण घटकांवर आधारित कृती** | | 10 मिनिटे |
| | 1. | वाक्यप्रकार (विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्‌गारार्थी, आज्ञार्थी वाक्य ओळखणे.) | 02 गुण | |
| | 2.<br>i.<br>ii.<br>iii.<br>iv. | वाक्यरूपांतर<br>प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर<br>उद्‌गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर<br>आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर<br>होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर | 02 गुण | |
| | 3. | वाक्‌प्रचार (3 पैकी कोणतेही 2) | 04 गुण | |
| | | | **8 गुण** | |

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| प्र.4. | आ. | **भाषिक घटकांवर आधारित कृती** | | 10 मिनिटे |
| | 1. | शब्दसंपत्ती, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शब्दसमूहाबद्दल एक शब्द, एकवचन – अनेकवचन, लिंग बदलणे (1 गुणाच्या कोणत्याही चार कृती) | 04 गुण | |
| | 2.<br>i.<br><br>ii. | लेखननियमांनुसार लेखन<br>अचूक शब्द ओळखा. (कोणतेही दोन शब्द-प्रत्येकी 4 पर्यायांसह देणे. चार पर्यायांपैकी 1 शब्द अचूक देणे)<br>दोन वाक्य देणे. (प्रत्येक वाक्यात लेखननियमांनुसार दोन चुकीचे शब्द देणे, ते शब्द दुरुस्त करून लिहिणे अपेक्षित) | 02 गुण | |
| | 3. | विरामचिन्हे (योग्य विरामचिन्हे वापरा किंवा विरामचिन्हे ओळखा.) | 02 गुण | |
| | | | **8 गुण** | |

| विभाग 5 | उपयोजित लेखन |
|---|---|

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| प्र.5. | अ. | **पत्रलेखन, सारांशलेखन** | | 10 मिनिटे |
| | 1.<br><br>2. | औपचारिक (मागणी / विनंती) **किंवा** अनौपचारिक (अभिनंदन)<br>**किंवा**<br>सारांशलेखन (विभाग – 1 गद्य (प्र. क्र. 1 (इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा 1/3 सारांश लिहिणे) | **06 गुण** | |
| प्र.5. | आ. | **जाहिरात लेखन, बातमी लेखन, कथालेखन** (3 पैकी कोणत्याही 2 कृती सोडवणे) | | |
| | 1. | जाहिरात लेखन (50 ते 60 शब्द) | **10 गुण** | 20 मिनिटे |
| | 2. | बातमी लेखन (50 ते 60 शब्द) | | |
| | 3. | कथालेखन (80 ते 90 शब्द) | | |
| प्र.5. | इ. | **लेखनकौशल्य** (3 पैकी 1 निबंध लिहिणे (100 ते 150 शब्द)) | | |
| | 1. | प्रसंगलेखन | 08 गुण | 25 मिनिटे |
| | 2. | आत्मकथन | | |
| | 3. | वैचारिक लेखन | | |
| | | | **24 गुण** | |
| | | To Review and Re-checking | - | **15 मिनिटे** |
| | | **एकूण** | **80 गुण** | **180 मिनिटे** |

Sample Content

# N 000

**Seat No.** | | | | | | | |

**2020 III 04 1100 – N 000 – MARATHI (16) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)**

## बोर्ड कृतिपत्रिका: मार्च 2020

**Time: 3 Hours** **(Pages 6)** **Max. Marks: 80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना: -**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन), आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग-5 उपयोजित लेखन प्र.5 (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.1 (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग 1 – गद्य

**पठित गद्य**

**प्र.1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(1) कोण ते लिहा.** **(2)**

i. नेहमी तिरके बोलणारे - ..........................

ii. बटाटा सोडण्याचा सल्ला देणारे - ..........................

"दोन महिन्यांत पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!" अशी भीष्मप्रतिज्ञा करून मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दांबद्दलची माझी आस्था वाढू लागली . साऱ्या ताटांतले पदार्थ मला न दिसता नुसत्या 'कॅलरीज' मला दिसू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी, की वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले. इतकेच काय, परंतु ज्या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला 'डाएटचा' सल्ला दिला. उदाहरणार्थ - सोकाजी त्रिलोकेकर.

"तुला सांगतो मी पंत, 'डाएट' कर. बटाटा सोड. बटाट्याचं नाव काढू नकोस."

"हो! म्हणजे 'कुठं राहता?' म्हणून विचारलं तर नुसतं 'चाळीत राहतो' म्हणा. 'बटाट्याची चाळ' म्हणू नका. वजन वाढेल! खी: खी: खी:!" जनोबा रेगे या इसमाला काय म्हणावे हे मला कळत नाही. नेहमी तिरके बोलायचे म्हणजे काय? पण सोकाजींनी त्याला परस्पर जामून टाकले. "ए इडिअट! सगळ्याच गोष्टींत जोक काय मारतोस नेमी? मी सांगतो तुला पंत — तू बटाटा सोड."

**(2) कृती पूर्ण करा.** **(2)**

**पंतांची आस्था वाढू लागलेले शब्द**

[ ] [ ]

Sample Content

**(3) स्वमत:**

पंतांना उपासाबाबत मिळालेल्या विविध सल्ल्यांचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा. **(3)**

**प्र.1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(1) का ते लिहा.** **(2)**

i. डॉ. माशेलकर यांना माशेल हे गाव सोडावे लागले, कारण ................................ .

ii. 'शाळेत कसा जाऊ? ' असा प्रश्न डॉ. माशेलकर यांच्यापुढे उभा राहिला, कारण ................................ .

आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल. माझे बालपण तिथेच गेले. माझे मामाही याच गावातले. तिथल्या एका मैदानावर खेळल्याच्या आणि पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात अधूनमधून वाऱ्याच्या लहरीसारख्या येत असतात. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील वारले आणि आम्हांला उदरनिर्वाहासाठी आमचे माशेल हे गाव सोडावे लागले. मी आणि माझी आई मुंबईत येऊन पोहोचलो. गिरगावातल्या खेतवाडीतील देशमुख गल्लीमध्ये 'मालती निवासा'तील पहिल्या माळ्यावर छोट्याशा खोल्यांमध्ये आम्ही मायलेक राहत होतो. आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावलेली. दारिद्र्याशी संघर्ष करणारी माझी अल्पशिक्षित आई आणि शिक्षणासाठी आसुसलेला; पण कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?' असे प्रश्नचिन्ह घेऊन वावरणारा मी. त्यावेळचं वातावरण हे असं होतं!

पण माझ्या आईनं धीर सोडला नाही. ती खचली नाही. वेगवेगळी कष्टाची कामं ती करत होती. त्यातच माशेलहून मुंबईत आलेले माझे मामाही मदतीला आले. त्यांच्यामुळे मला खेतवाडीतील प्राथमिक शाळेत प्रवेश मिळू शकला. ही शाळा महापालिकेची होती. माझ्याप्रमाणेच शाळेचीही परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र मनानं खूप श्रीमंत होते. पायात चप्पलही घालायला नव्हती अशा परिस्थितीत माझी शाळा सुरू होती.

**(2) आकृती पूर्ण करा.** **(2)**

**डॉ. माशेलकर यांच्या माशेल गावातील आठवणी**



**(3) स्वमत:**

शालेय विद्यार्थ्याच्या भूमिकेतील डॉ. माशेलकर यांचे तुम्हांला जाणवलेले गुणविशेष सोदाहरण लिहा. **(3)**

**अपठित गद्य**

**प्र.1. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(1) योग्य जोड्या लावा.** **(2)**

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| i. | सूर्य | पाणी |
| ii. | मेघ | वस्त्र |
| iii. | शेतकरी | प्रकाश |
| iv. | विणकर | धान्य |

संयमाला तुच्छ मानू नका. तुमच्या विकासासाठी तो आहे. समाजाच्या हितासाठी तो आहे. आपण संयम पाळला नाही, तर आपले काम नीट होणार नाही. काम नीट झाले नाही म्हणजे समाजाचे नुकसान होणार. आपण केवळ आपल्या स्वत:साठी नाही. आपण समाजासाठी आहोत, याची जाणीव आपणांस हवी. हा आपला देह, हे आपले जीवन समाजाचे आहे. आपले पोषण सारी सृष्टी करीत आहे. सूर्य प्रकाश देत आहे, मेघ पाणी देत आहेत, वृक्ष फुले-फळे देत आहेत, शेतकरी धान्य देत आहे, विणकर वस्त्र देत आहे. आपण या सर्व सजीव-निर्जीव सृष्टीचे आभारी आहोत. यासाठी हे आपले जीवन त्यांच्या सेवेत अर्पण करणे हे आपले काम आहे.

sample content

**(2) एका शब्दात उत्तरे लिहा.** **(2)**

i. आपल्या विकासासाठी आवश्यक असलेला – ________

ii. आपले पोषण करणारी – ________

## विभाग 2 – पद्य

**प्र.2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(1) चौकटी पूर्ण करा.** **(2)**


i. मुळावर घाव घातले; तरी मुकाट सहन करणारे – [ ]

ii. अलगद उतरणारे थेंब – [ ]

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**(2) आकृती पूर्ण करा.** **(2)**

**झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी**



Sample Content

**(3) प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा.** **(2)**

i. मुकाट – ii. मुसाफिर –

iii. संथ – iv. मौन व्रत –

**(4) काव्यसौंदर्य:** **(2)**

'जगावं कसं तर? हिरव्या झाडासारखं' या ओळीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.

**प्र.2. (आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.**

| | मुद्दे | 'अंकिला मी दास तुझा' किंवा 'स्वप्न करू साकार' | | |
|---|---|---|---|---|
| 1. | प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री | | | (1) |
| 2. | प्रस्तुत कवितेचा विषय | | | (1) |
| 3. | प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा. | 'अग्निमाजि पडे बाळू।<br>माता धांवें कनवाळू।।' | 'हजार आम्ही एकी बळकट<br>सर्वांचे हो एकच मनगट।।' | (2) |
| 4. | प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण | | | (2) |
| 5. | प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा. | i. काज –<br>ii. सवें –<br>iii. पाडस –<br>iv. धेनू – | i. विभव –<br>ii. मंगल –<br>iii. श्रम –<br>iv. हस्त – | (2) |

## विभाग 3 – स्थूलवाचन

**प्र.3. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(6)**

(1) टीप लिहा: व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

(2) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते हे 'मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठाच्या आधारे लिहा.

(3) 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!' या विधानाची यथार्थता स्पष्ट करा.

## विभाग 4 – भाषाभ्यास

**प्र.4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(1) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **(2)**

i. तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का?

ii. रनिंगपेक्षादेखील दोरीवरच्या उड्या मारा.

**(2) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.** **(2)**

i. नेहमी खरे बोलावे. (नकारार्थी करा.)

ii. तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा. (विधानार्थी करा.)

**(3) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (कोणतेही दोन):** **(4)**

i. उत्साहाला उधाण येणे ii. गलका करणे iii. झोकून देणे

Sample Content

**प्र.4. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(1) शब्दसंपत्ती:**

**(1) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(1)**

i. पाऊस = ii. मधुर =

**(2) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

i. सुरुवात × ii. स्तुती ×

**(3) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(1)**

पायात चप्पल न घालता [ ]

**(4) वचन बदला.** **(1)**

i. गोष्ट ii. कल्पना

**(2) लेखननियमांनुसार लेखन:**

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.** **(2)**

i. कवीवर्य नारायण सुर्वे खुप सभा, संमेलने गाजवत.

ii. तीने माझ्यासाठी प्रंचड कष्ट केले.

**(3) विरामचिन्हे:**

**खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा.** **(2)**

i. अरे पण चिठ्ठी मराठीतून आहे.

ii. "काका हे शास्त्रीय सत्य आहे"

## विभाग 5 – उपयोजित लेखन

**प्र.5. (अ) खालील कृती सोडवा.** **(6)**

**(1) पत्रलेखन:**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.**

**जीवनज्योती विद्यालय,**

नांदगाव

कथाकथन स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

दि. 22 जुलै

वेळ : दुपारी 4 वा.

प्रमुख पाहुणे – मा. श्री. अजय लागू

अध्यक्ष : मा. श्री. उत्तम कांबळे

संपर्क – jj22@gmail.com

दीपक/दीपाली माने

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

पारितोषिक प्राप्त विद्यार्थी सुहास/ सुनीता देसाई, यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

पारितोषिक वितरण समारंभासाठी अध्यक्ष म्हणून मा. उत्तम कांबळे यांना उपस्थित राहण्याची विनंती करणारे पत्र लिहा.

Sample Content

किंवा

**(2) सारांशलेखन:**

**विभाग 1 गद्य (इ) (प्रश्न. क्र. 1 - इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र.5. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(10)**

**(1) जाहिरात लेखन:**

पुढील विषयावर जाहिरात तयार करा.

शाळेतर्फे मे महिन्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या चित्रकला वर्गाची जाहिरात तयार करा.

**(2) बातमीलेखन:**

**खालील निवेदन वाचून बातमी तयार करा:**

**साने गुरुजी विद्यालय, सोलापूर**

भव्य वार्षिक क्रीडा महोत्सव संपन्न

दि. : 13 जानेवारी

वेळ : सकाळी 8 वाजता

प्रमुख पाहुणे : मा. सौ. अपर्णा भोसले

अध्यक्ष : मा. श्री. रोहित बर्वे

इ. 5 वी ते 9 वी च्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग

* कवायतीचे प्रकार
* मल्लखांबाचे प्रकार
* लेझीम नृत्य
* क्रीडा साहित्यावर आधारित नृत्य प्रकार
* बक्षीस समारंभ

**(3) कथालेखन:**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.

आंतरशालेय क्रीडास्पर्धा – धावण्याची स्पर्धा – शाळेतर्फे वरदचा सहभाग – वरद उत्तम धावपटू – सराव – उत्तम धावपटू तनयशी स्पर्धा – प्रत्यक्ष स्पर्धा – चुरशीची स्पर्धा – अचानक तनयचा पाय मुरगळणे – स्पर्धा सोडून वरदचे मदतीला धावणे – स्पर्धा हरूनही वरदचे कौतुक –

**प्र.5. (इ) लेखनकौशल्य:**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **(8)**

**(1) प्रसंगलेखन:**

खालील मुद्द्यांच्या आधारे पावसाळ्यातील एका दिवसाचा तुम्ही घेतलेला अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.

निसर्गदृश्य ← **पावसाळ्यातील एक दिवस** → आनंददायी वातावरण

↓

अविस्मरणीय दिवस

**(2) आत्मकथन:**

**दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.**

उपयोग व महत्त्व ↖ **पुस्तक** ↗ वैशिष्ट्ये

खंत ↙ ↘ आनंद

**(3) वैचारिक लेखन:**

'युग संगणकाचे' या विषयावर खालील मुद्द्यांच्या आधारे तुमचे विचार लिहा.

काळाची गरज – महत्त्व – फायदे/तोटे – सदुपयोग.

Sample Content

**प्र.1. (अ)**

### विभाग 1 – गद्य

**पठित गद्य**

**(1)** i. जनोबा रेगे

ii. सोकाजी त्रिलोकेकर

**(2)** पंतांची आस्था वाढू लागलेले शब्द

- **प्रोटीनयुक्त पदार्थ**
- **चरबीयुक्त द्रव्ये**

**(3)** वजन कमी करण्यासंदर्भात पंतांना अनेक लोकांकडून वेगवेगळे सल्ले मिळाले. गंमत अशी, की वजन कसे कमी करावे या विषयाचे ज्ञान असलेले अनेक लोक त्यांना भेटू लागले. त्यांच्या चाळीत राहणाऱ्या लोकांनी त्यांना डाएट करण्याविषयी सुचवले. सोकाजी त्रिलोकेकर हे त्यांच्यापैकी एक. त्यांनी पंतांना बटाटा वर्ज्य करण्याचा सल्ला दिला; किंबहुना बटाटा खाणं सोडण्याबरोबरच बटाट्याचं नावही घेणं पंतांनी थांबवावं असं ते म्हणाले.

त्याचवेळी त्यांचं हे बोलणं ऐकून जनोबा रेगे या पंतांच्या दुसऱ्या शेजाऱ्यांनी त्यांची चेष्टादेखील केली. बटाट्याची चाळ या नावातील बटाटादेखील पंतांनी वर्ज्य करावा आणि नुसतं चाळ म्हणावं असं ते थट्टा करत म्हणाले. इतरांना सल्ले देण्याची लोकांची सवय आणि त्यावर लेखकांनी केलेले नर्मविनोद यांमुळे हा प्रसंग अतिशय गमतीदार वाटतो.

---

**प्र.1. (आ)**

**(1)** i. डॉ. माशेलकर हे सहा वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले आणि त्यामुळे उदरनिर्वाहासाठी त्यांना आईबरोबर मुंबईला जावे लागले.

ii. वडील गेल्यानंतर आर्थिक स्थिती खालावल्यामुळे दारिद्र्याशी संघर्ष करणाऱ्या लेखकाच्या आईला शाळेसाठी फी भरणे शक्य नव्हते.

**(2)** डॉ. माशेलकर यांच्या माशेल गावातील आठवणी

- **मैदानात खेळल्याच्या**
- **पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या**

**(3)** डॉ. माशेलकर लहान असतानाच त्यांचे वडील वारल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खालावलेली होती. दारिद्र्यामुळे शाळेची फी भरणेदेखील त्यांना अवघड वाटत होते; मात्र दारिद्र्यातही त्यांची शिक्षण घेण्याची इच्छा कमी झाली नव्हती. ते शिक्षणासाठी आसुसलेले होते. मोठ्या मुश्किलीने खेतवाडीतील महापालिकेच्या प्राथमिक शाळेत त्यांना प्रवेश मिळाला आणि त्यांनी जिद्दीने आपले शिक्षण सुरू केले. पायात घालायला चप्पलही नाही अशी परिस्थिती असतानादेखील त्यांनी शाळेत जाण्यास सुरुवात केली. या सर्वांमधून माशेलकर यांची शिक्षणाविषयीची तीव्र आस्था आणि तळमळ तसेच कष्ट करण्याची तयारी आणि जिद्द हे गुण जाणवतात.

Sample Content

प्र.1. (इ)

## अपठित गद्य

(1)

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| सूर्य | प्रकाश |
| मेघ | पाणी |
| शेतकरी | धान्य |
| विणकर | वस्त्र |

(2) i. संयम ii. सृष्टी

प्र.2. (अ)

## विभाग 2 – पद्य

(1) i. मुळावर घाव घातले; तरी मुकाट सहन करणारे – **झाड**
ii. अलगद उतरणारे थेंब – **दवबिंदू**

(2) झाडाकडे टक लावून पाहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी

- **हिरवा रंग शरीरभर विरघळतो**
- **रक्त क्षणभर हिरवेगार होते**
- **आयुष्य नुकत्याच खुडलेल्या फुलाप्रमाणे टवटवीत, प्रसन्न होते**

(3) i. शांत ii. प्रवासी/ वाटसरू
iii. सावकाश / मंद iv. काहीही न बोलणे

(4) वरील काव्यपंक्ती जॉर्ज लोपीस यांच्या ‘हिरवंगार झाडासारखं’ या कवितेतील आहे. सहनशीलता, परोपकारी वृत्ती, दानीपणा, कठीण प्रसंगातही न डगमगता पाय रोवून राहण्याचा खंबीरपणा हे झाडाचे गुण आपणही आपल्यामध्ये आणावेत असा संदेश कवी देत आहे.

झाड आपल्याला सळसळत्या पानासारखे मनमोकळे हसायला शिकवते. मातीत घट्ट पाय रोवून उभे असणारे झाड आपल्याला कोणत्याही परिस्थितीत खंबीरपणे उभे राहण्याची वृत्ती शिकवते, मातीत रुजण्याची, मुरण्याची कला शिकवते. हिरवेगार झाड आपल्याला जगायचे कसे हे शिकवते, तर रोज शांत चित्ताने चिंतन करण्याची कलाही झाडच शिकवते. असा विचार वरील ओळींद्वारे कवी व्यक्त करतात. झाड जणू काही मानवाप्रमाणे विविध कृती करत आहे अशी वेगळी कल्पना येथे केली आहे.

प्र.2. (आ)

| ‘अंकिला मी दास तुझा’ किंवा ‘स्वप्न करू साकार’ | |
|---|---|
| 1. संत नामदेव | 1. किशोर पाठक |
| 2. परमेश्वर भेटीची तीव्र इच्छा | 2. देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न |
| 3. आगीच्या तडाख्यात सापडलेल्या बाळाला पाहून त्याची दयाळू आई त्याला वाचवण्यासाठी धाव घेते. (तसाच तू माझ्यासाठी धाव घेतोस). | 3. आम्ही भारतीय संख्येने अगणित आहोत तरी आमची एकता अखंड आहे. आमच्या मनगटात एकीची शक्ती आहे. |



Sample Content

| | |
|---|---|
| 4. 'अंकिला मी दास तुझा' हा अभंग मला फार आवडतो, कारण अभंगाची भाषा साधी-सरळ आहे. अत्यंत मोजक्या शब्दांत विविध दृष्टान्त (उदाहरणे) देऊन नामदेवांनी आपला उत्कट भाव कवितेत व्यक्त केला आहे. छोटे छोटे चरण (ओळी) वापरून नेमका अर्थ आपल्यापर्यंत पोहोचवला आहे. अभंगात 'बिंदूमध्ये सिंधू' म्हणजेच कमी शब्दांत खूप अर्थ व्यक्त करण्याची शक्ती आहे, हे या अभंगातून दिसून येते. ही संतकविता गाता येते. तसेच, ती वाचनीय, श्रवणीय असल्यामुळे मला फार आवडते. | 4. हे समूहगीत साध्या, सोप्या भाषेत देशातील शेतीसंस्कृती, श्रमांचे महत्त्व व एकता या मूल्यांवर भर देते. आपल्या देशाची भरभराट होवो, विकास होवो असा शुभ विचार व्यक्त करतानाच आपण सर्वांनी या कार्यात पुढाकार घेऊया असा प्रयत्नवादी दृष्टिकोन कवी मांडतात. ही कविता उत्साही भाव व सकारात्मकता निर्माण करते. यमक साधणारी, तालबद्ध रचना असल्यामुळे ती लयीत गाता येते. सर्व देशवासियांना देश घडवण्याची प्रेरणा देणारी ही कविता मला फारच आवडते. |
| 5. i. काम ii. लगेच<br>iii. हरिणीचे पिल्लू iv. गाय | i. ऐश्वर्य / संपत्ती ii. पवित्र<br>iii. कष्ट iv. हात |

**प्र.3.**

## विभाग 3 – स्थूलवाचन

(1) व्युत्पत्ती सांगणे म्हणजे एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे हे व्युत्पत्ती कोशाचे कार्य होय. व्युत्पत्ती कोशाचे कार्य हे प्रामुख्याने चार प्रकारचे असते, ते पुढीलप्रमाणे:

अ. **शब्दाचे मूळ रूप दाखवणे:** भाषेतील बदलत गेलेल्या शब्दांचे मूळ आपल्याला व्युत्पत्ती कोशाच्या माध्यमातून शोधता येते. उदाहरणार्थ, मराठी भाषेतील 'आग' हा शब्द संस्कृतमधील 'अग्नि' या शब्दापासून आला आहे.

ब. **अर्थांतील बदल स्पष्ट करणे:** काळानुसार, शब्दांच्या स्वरूपात, अर्थात व त्यांच्या परस्परसंबंधात बदल होतात. काहीवेळा मूळ अर्थासोबतच अधिकचा एखादा अर्थ त्या भाषेत रूढ होतो. उदा. व्युत्पत्ती कोशानुसार शहाणा म्हणजे हुशार, बुद्धिमान; पण सध्या 'शहाणा' म्हणजे 'अतिशहाणा' हा अर्थदेखील रूढ होत आहे. समान दिसणाऱ्या शब्दांचे वेगवेगळे अर्थदेखील व्युत्पत्ती कोशातून उलगडतात. उदा. पाठ. शरीराचा अवयव किंवा पुस्तकातील धडा.

क. **उच्चारातील बदल व फरक दाखवणे:** एखाद्या शब्दाचे मूळ रूप, त्याचा इतिहास, अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे हेही व्युत्पत्ती कोशात दाखवलेले असते. उदा. दीपावली हा मूळ संस्कृत शब्द; मराठीत त्याचा दिवाळी हा शब्द बनला आहे.

ड. **बदलांचे कारण स्पष्ट करणे:** भाषेत बदल होण्यामागे बहुतेकदा सुलभीकरणाची म्हणजेच सोपे करण्याची प्रवृत्ती असते किंवा कोणत्याही दोन भाषा बोलणारे भाषिक एकमेकांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते. या सर्व बदलांमागच्या कारणांची नोंद करणे हे व्युत्पत्ती कोशाचे कार्य आहे.

(2) लेखक 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर'च्या ट्रेनिंग स्कूलमध्ये प्रशिक्षण घेत असताना तेथे त्यांच्यासह सुमारे शंभर मुले-मुली दाखल झाल्या होत्या. एवढ्या मोठ्या संख्येने प्रशिक्षणासाठी नेमलेल्या सर्वांना पुरेल एवढे काम बार्कमध्ये आहे का, असा प्रश्न प्रशिक्षणार्थींना पडला होता. त्यावेळी डॉ. होमी भाभा यांनी त्यांना "तुम्ही स्वत:च काम निर्माण करा. आपण काय काम करायचे ते आपणच ठरवले पाहिजे. बॉसने आपल्याला सांगितलं असेल तेवढंच काम करायचं आणि काही सांगितलं नसेल तेव्हा आपल्याला कामच नाही असं समजायचं, ही चुकीची गोष्ट आहे. ही प्रवृत्ती गेली पाहिजे." असे मोलाचे मार्गदर्शन केले. लेखकाने त्यांनी दिलेल्या या सूचनेचे तंतोतंत पालन केले आणि त्यानंतर आपले काम आपणच शोधल्यास 'स्काय इज द लिमिट' अशी परिस्थिती खरोखरच निर्माण होत असल्याचा अनुभव घेतला. म्हणजेच, एखादे काम करताना वरिष्ठ सांगतील तेवढे आणि तेवढेच न करता आपण स्वत:च्या बुद्धीचा वापर केला पाहिजे. स्वत: जबाबदारी घेऊन, स्वप्रेरणेने अधिकाधिक कष्ट घेऊन ते काम पूर्ण

Sample Content

केले पाहिजे. आपण स्वत:च स्वत:ला घडवले, ऊर्जा मिळवली, स्वत:चे मार्ग स्वत:च शोधले, की 'स्काय इज द लिमिट' अशी परिस्थिती निर्माण होते.

(3) कॅक्टस हा वाळवंटी प्रदेशामध्ये दुष्काळाचा सामना करत जगणाऱ्या वनस्पतींचा जणू प्रतिनिधी आहे. वाळवंटात टिकून राहण्यासाठी निसर्गाने या झाडाला अनोखी वैशिष्ट्ये बहाल केली आहेत. पाऊस पडेल तेव्हा जे मिळेल ते पाणी कॅक्टस स्वत:मध्ये साठवून ठेवतो आणि कोरड्या हंगामामध्ये त्याची वाढ हळूहळू होत राहते. या झाडाच्या मुळांची रचना थोड्या वेळात पुष्कळ पाणी शोषून घेता येईल अशी असते. लांबवर मुळे पसरवून कॅक्टस सभोवतालच्या भागातील पाणी शोषून घेते. त्याचबरोबर कॅक्टसची अंगरचना पाणी साठवण्यासाठी अनुकूल अशी बनली आहे. त्याच्या अंगाचा कमीतकमी भाग कोरड्या, उष्ण हवेसमोर येतो. बहुतेक कॅक्टसची रचना घडीदार असल्यामुळे जेव्हा पाऊस पडतो, तेव्हा घड्यांचा उपयोग पन्हाळीसारखा होऊन पावसाचे पाणी थेट मुळांपर्यंत पोहोचते. त्याचबरोबर बाष्पीभवनापासून वाचण्यासाठी या झाडाला पानेच नसतात. या सर्व वैशिष्ट्यांमुळे 'कॅक्टस हा थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा उत्तम नमुना आहे', हे विधान यथार्थ वाटते.

प्र.4. (अ)

## विभाग 4 – भाषाभ्यास

**(1)** i. प्रश्नार्थी वाक्य

ii. आज्ञार्थी वाक्य

**(2)** i. कधीही खोटे बोलू नये.

ii. तुमची उर्जाशक्ती एकत्र करावी.

**(3)** i. उत्साहाला उधाण येणे – खूप उत्साही वाटणे.

**वाक्य** – बाईंनी वर्गात सहलीची सूचना वाचून दाखवताच मुलांच्या **उत्साहाला उधाण आले.**

ii. गलका करणे – गोंगाट करणे.

**वाक्य** – बागेजवळ आईस्क्रीमची गाडी पाहताच खेळणारी सगळी मुले **गलका करू लागली.**

iii. झोकून देणे – पूर्णपणे सहभागी होणे.

**वाक्य** – भूकंपग्रस्त गावाची अवस्था पाहताच सागररावांनी मदतकार्यात स्वत:ला **झोकून दिले.**

प्र.4. (आ)

**(1)** (1) i. पर्जन्य ii. गोड

(2) i. सुरुवात × शेवट ii. स्तुती × निंदा

(3) अनवाणी

(4) i. गोष्टी ii. कल्पना

**(2)** i. **कविवर्य** नारायण सुर्वे **खूप** सभा, संमेलने गाजवत.

ii. **तिने** माझ्यासाठी **प्रचंड** कष्ट केले.

**(3)** i. "अरे, पण चिठ्ठी मराठीतून आहे."

ii. "काका, हे शास्त्रीय सत्य आहे."

Sample Content

प्र.5. (अ) (1)

## विभाग 5 – उपयोजित लेखन

**पत्रलेखन**

**अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**

दिनांकः 23 जुलै 2023

प्रिय मित्र सुहास,

सप्रेम नमस्कार,

आपल्या शाळेत झालेल्या कथाकथन स्पर्धेत तुला प्रथम पारितोषिक मिळाले यासाठी सर्वप्रथम तुझे खूप खूप अभिनंदन मित्रा! मला खूपच आनंद झाला. सलग तिसऱ्या वर्षी तुला प्रथम पारितोषिक मिळाले आहे. तू निवडलेली कथा, ती कथा सादर करत असताना तुझा आत्मविश्वास, शब्दोच्चार, शब्दांच्या चढ-उताराची शैली सगळेच वाखाणण्याजोगे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. लागू सरांनी, तसेच अध्यक्ष मा. श्री. उत्तम कांबळे सरांनीही याचा उल्लेख करून तुझे कौतुक केले. तू सादर करत असलेल्या कथेत आम्ही श्रोतेसुद्धा रममाण झालो होतो. कथेतील पात्रे, प्रसंग अगदी आमच्या डोळ्यांसमोर उभे राहत होते. तुझ्या कथाकथनातील प्रगतीची ही पावतीच म्हणावी लागेल.

तुझ्या या यशाचे सर्वांनाच कौतुक वाटत आहे. आईबाबांनीही तुझे अभिनंदन केले आहे. तुझ्या पुढील वाटचालीसाठी तुला खूप खूप शुभेच्छा. पुन:श्च अभिनंदन.

तुझा मित्र,
दीपक माने
15, साईधाम निवास,
राजीव गांधी मार्ग,
नांदगाव- xxxxxx
abc@xyz.com

**किंवा**

**विनंती पत्र (औपचारिक)**

दिनांकः 18 जुलै 2022

प्रति,
माननीय श्री. उत्तम कांबळे,
12, श्रीराम सोसायटी,
महावीर नगर,
चिपळूण - xxxxxx
uttamkamble@xyz.com

**विषय:** पारितोषिक वितरण समारंभासाठी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहण्याबाबत.

महोदय,

मी दीपक माने, जीवनज्योती विद्यालय, नांदगाव या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने आपणांस हे पत्र लिहीत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आमच्या शाळेत कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी अध्यक्ष म्हणून आपण उपस्थित राहावे, अशी आम्हां सर्वांची इच्छा आहे.

दिनांक 22 जुलै रोजी दुपारी 4 वाजता होणाऱ्या या समारंभाचे अध्यक्ष म्हणून आपण उपस्थित राहावे, अशी मी आपणांस विनंती करतो. आपल्या उपस्थितीने आम्हां सर्व विद्यार्थ्यांना आपले मार्गदर्शन मिळेल.
आपण आमची ही विनंती मान्य करून या कार्यक्रमाची शोभा वाढवाल, अशी मी आशा करतो.

कळावे,

Sample Content

आपला विश्वासू,
दीपक माने
विद्यार्थी प्रतिनिधी,
जीवनज्योती विद्यालय,
महात्मा गांधी मार्ग,
नांदगाव- xxxxxx
jj22@gmail.com

**किंवा**

**(2)** **सारांशलेखन**

तुमच्या विकासासाठी व समाजहितासाठी संयम महत्त्वाचा आहे. निसर्गातील सूर्य, ढग, झाडे तसेच, शेतकरी, विणकर इत्यादींमुळे आपले पालनपोषण होते. तेव्हा या सर्वांचे आभार मानण्यासाठी आपण आपले आयुष्य त्यांना समर्पित केले पाहिजे.

**प्र.5. (आ)** **(1)** **जाहिरातलेखन**

**शारदा विद्यालय, ठाणे तर्फे आयोजित**

**इंद्रधनू चित्रकला वर्ग**

**चला नवे रंग भरूयात...**
(उन्हाळी सुट्टीत खास विद्यार्थ्यांसाठी)

**चित्रकला क्लासची वैशिष्ट्ये**
- इयत्तेनुसार वर्गाची सोय
- माफक फी
- विविध उपक्रम आणि ॲसाइनमेंटस्
- एलिमेंटरी तसेच इंटरमिजिएट परीक्षांची पूर्वतयारी करून घेतली जाईल.

**प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना चित्रकलेचे साहित्य शाळेतर्फे पुरवले जाईल.**

1 मे पासून सुरू
सोमवार ते शनिवार क्लास सुरू राहतील.
वेळ - सकाळी 10 ते 12 - इयत्ता 8वी, 9वी, 10वी
दुपारी 12 ते 2 - इयता 5वी, 6वी, 7वी

| | |
|---|---|
| संपर्क: श्री. जांभळे सर<br>पत्ता - शारदा विद्यालय,<br>राम - मारुती रोड, घंटाळी,<br>ठाणे - 400601 | दूरध्वनी क्रमांक – xxxxxxxxxx<br>इ-मेल-<br>sharadavidyalay@gmail.com |

Sample Content

(2)

**स्पर्धांबरोबरच उद्‌घाटन सोहळा ठरला आकर्षण**

**आमच्या प्रतिनिधीकडून**

सोलापूर, दिनांक 14 जानेवारी : सोलापूरमधील साने गुरुजी विद्यालयाचा 40 वा वार्षिक क्रीडामहोत्सव दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळी 8 वाजता सुरू झालेल्या या क्रीडामहोत्सवाला प्रमुख पाहुण्या म्हणून मा.सौ. अपर्णा भोसले यांना निमंत्रित करण्यात आले होते, तर सोहळ्याचे उद्‌घाटन अध्यक्ष मा. श्री. रोहित बर्वे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्‌घाटनप्रसंगी सादर केलेल्या हलगीवरील लेझीम नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर सादर केलेल्या सांगीतिक कवायतीने तर प्रेक्षकांना वेड लावले. इयत्ता 9 वी च्या विद्यार्थ्यांनी मल्लखांबाचे प्रकार सादर केले. इयत्ता 5 वी व 6 वीच्या विद्यार्थ्यांनी क्रिकेट बॅट, हॉकी स्टिक, फुटबॉल यांचा वापर करून सादर केलेले नृत्य मनोरंजक होते. मा. सौ. अपर्णा भोसले यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे व पालकांच्या उपस्थितीमुळे सर्वच विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा व खेळांमध्ये जिद्द, चिकाटी दाखवून खेळ केला. शेवटी प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते बक्षीस समारंभ झाल्यावर विद्यार्थी प्रमुख कुमारी अहानाने उपस्थितांचे आभार मानले.

(3) **कथालेखन**

**माणुसकीची शिकवण**

त्यादिवशी वरद घरी आला तो उड्या मारतच. त्यांच्या जिल्ह्यामध्ये लवकरच आंतरशालेय क्रीडा स्पर्धा होणार होती. क्रीडास्पर्धेमध्ये धावण्याची स्पर्धा होती. वरद हा एक उत्तम धावपटू असल्यामुळे शाळेतर्फे वरदने या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा असं मुख्याध्यापकांचं म्हणणं होतं. वरदने दुसऱ्या दिवशीपासूनच स्पर्धेचा सराव सुरू केला.

वरदच्या घराजवळ राहणारा तनय हादेखील उत्तम धावपटू होता आणि तोही त्याच्या शाळेमधून आंतरशालेय क्रीडास्पर्धेमध्ये भाग घेणार होता. आपण तनयला नक्कीच हरवू आणि पहिला क्रमांक मिळवू असा वरदला आत्मविश्वास होता आणि त्यासाठी तो भरपूर मेहनतही करत होता. अखेर स्पर्धेचा दिवस उजाडला. प्रत्यक्ष स्पर्धा सुरू झाली. वरद, तनय आणि आणखी दोन मुलांमध्ये अतिशय चुरशीची स्पर्धा होती. वरद जीव तोडून धावत होता आणि अचानक तनयचा पाय मुरगळला. तनय मटकन खाली बसला. वरदच्या हे लक्षात आलं. मागचापुढचा विचार न करता त्याने स्पर्धा सोडून तनयकडे धाव घेतली. त्याला उठायला मदत केली आणि हळूहळू आधार देऊन धावपट्टीच्या बाजूला असलेल्या एका बाकावर बसवलं. तनयचे शिक्षक आणि क्रीडास्पर्धेचे आयोजक हे सगळं बघत होते. तनयचे शिक्षकही धावत मदतीला आले.

तनय आणि वरद दोघेही स्पर्धेतून बाद झाले आणि दुसरा एक मुलगा स्पर्धा जिंकला. आपण जिंकू शकलो नाही या विचारांनी वरदच्या डोळ्यांमध्ये पाणी आलं; पण तेवढ्यात अचानक त्याच्या नावाचा पुकारा झाला. स्पर्धेचे आयोजक बोलत होते, "या धावण्याच्या स्पर्धेत पहिले बक्षीस एका धावपटूने मिळवले असले, तरी या संपूर्ण क्रीडास्पर्धेमध्ये अव्वल ठरलेला एक खेळाडू म्हणून आज मी वरदचं नाव घोषित करतो. स्पर्धेपेक्षा देखील माणुसकी महत्वाची असते ही एक अतिशय महत्त्वाची गोष्ट आज आपल्याला वरदने शिकवली. आयोजकांचे शब्द संपताच टाळ्यांचा कडकडाट झाला. स्पर्धा हरल्याचं दु:ख वरद विसरला. स्पर्धा जिंकण्याच्या आनंदापेक्षा दुसऱ्याची मदत करण्यातला आनंद मोठा आहे हे आज त्यालाही उमगलं होतं.

**तात्पर्य:** माणुसकीचा विचार करून एकमेकांना मदत करणे हा सर्वांत मोठा गुण आहे.

Sample Content

| | | |
|---|---|---|
| प्र.5. (इ) | (1) | **प्रसंगलेखन** |

**पावसाळ्यातील एक दिवस**

गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले...

या कवी बा.भ. बोरकरांच्या काव्यपंक्तींनी मनात फेर धरला होता. बाहेर अंधारून आले होते. मी खिडकीतून बाहेर पाहत होते. अचानक सोसाट्याचा वारा सुटला. सूं सूं करत वारा थैमान घालू लागला. वावटळ येईल की काय अशी शंका मनात येत होती, तितक्यात दार जोरात बंद झाल्याचा आवाज आला. आमच्या घरासमोरून दिसणाऱ्या थोड्या अंतरावरच्या मैदानात धुळीचा लोट आकाशात उडाला, भोवऱ्यासारखा गोलाकार घुमत घुमत खाली आला आणि त्याने आपले अंग भसकन् जमिनीवर लोटून दिले. सर्वत्र पालापाचोळा उडाला. संपूर्ण वातावरणात धूळभरलेपणा भरून राहिला होता. कोणत्याशा अनाम क्षणी आकाशात लख्खकन् वीज सळसळली आणि टपोऱ्या थेंबांचा वर्षाव सुरू झाला.

धरतीवर सडा शिंपला गेला. मातीचा सुगंध आसमंतात दरवळला आणि त्या थंडगार सरींचा स्पर्श अनुभवण्यासाठी माझे हात नकळत खिडकीबाहेर सरसावले. हातावर पडणारे मोती झेलत, उधळत किती वेळ घरात राहणार? मग बिनधास्तपणे प्रत्यक्ष पाऊस अंगावर घेण्यासाठी बाहेर मोकळ्या वातावरणात आले.

छपरावरून वाहणाऱ्या पाण्याच्या थेंबांनी छान ताल धरला होता. चिखलाचे छोटे-छोटे ओघळ पटापट, वाट फुटेल तिथे धावत होते. मी त्या पावसात अगदी मनसोक्त भिजले. आनंदाने गाणी गायले. चिखलात उड्या मारल्या. माझ्यासोबत आजूबाजूची झाडेही पावसात भिजण्याचा मनमुराद आनंद लुटत होती. संपूर्ण धरती सचैल स्नान करत होती. ढगांनी आपली सर्व पोतडी भरभरून धरेवर लोटून दिली होती जणू! वातावरण चैतन्यमय झाले होते. नवजीवन ल्यायलेली सृष्टी आनंदविभोर बनली होती... अगदी माझ्याप्रमाणेच! थकलेल्या, कंटाळलेल्या, श्रांत मनाला या सरींच्या शिडकाव्याने उल्हसित केले होते. हे अविस्मरणीय क्षण मनात साठवत, पावसाचे मुक्त, बरसणारे रूप अनुभवत माझी पावले घराच्या दिशेने वळली. जणू 'श्रावणात घननिळा बरसला रिमझिम रेशीम धारा। उलगडला पानांतून अवचित हिरवा मोरपिसारा।' असा प्रत्यय मी आज अनुभवला होता!

**किंवा**

(1) **आत्मकथन**

**मी पुस्तक बोलत आहे...**

"नमस्कार विद्यार्थी मित्रांनो, अभ्यास करताय ना? अहो, मी तुमचा मित्र 'पुस्तकराव' बोलतोय. तसे माझे आणि तुमचे नाते अगदी बालपणापासूनचे! माझ्याद्वारे तुम्ही गाणी, गोष्टी शिकता. तालासुरात कविता म्हणायला व घडाघडा पाठ वाचायलाही शिकता. माझ्यातील रंगीत, बोलकी चित्रे पाहून किती आनंद मिळतो तुम्हांला! खरंच,तुमच्या दिवसाची सुरुवात माझ्या वाचनाने होते, हे पाहून मला खूप आनंद होतो. मला माझ्याजवळ असलेला माहितीचा, ज्ञानाचा खजिना तुम्हांला उलगडवून दाखवता येतो. तुमचा एखादा कंटाळवाणा, थकलेला क्षण माझ्या संगतीने मनोरंजक बनू शकतो. तुम्हांला एखाद्या वेगळ्याच विश्वात घेऊन जाताना मी तुमचा वाटाड्या बनू शकतो. ज्ञान, विज्ञान, मनोरंजन अशा विविध क्षेत्रांशी तुमची भेट घालून देण्याचे भाग्य मला लाभते. त्यामुळे, तुमच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.

झाडापासून कागदनिर्मिती होईपर्यंत, अगदी पुस्तक बांधणी ते पुस्तक प्रकाशित करण्यापर्यंतचा हा प्रवास मी अनुभवलेला असतो. हजारो हातांनी मेहनत केलेली असते, मला तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी! कागदनिर्मिती करणाऱ्या सामान्य मजूर, कारागिरांपासून लेखक, प्रकाशक यांचा माझ्या निर्मितीमागे मोलाचा वाटा असतो. या सर्वांच्या मेहनतीची जाणीव नसल्यामुळेच काही लोक माझा नीट वापर करत नाहीत. कव्हर्स घालणे तर दूरच; पण काही खाता-पिताना माझ्यावर डाग पाडतात. माझी पाने दुमडतात. मला निष्काळजीपणे हाताळल्यामुळे मी फाटतो. काहीजण तर मला उशीसारखे डोक्याखाली घेऊन झोपतात. असे हे बेजबाबदार वागणे मला अजिबात आवडत नाही. अतिशय दु:ख होते.



Sample Content

मला तुम्हां सर्व मुलांना असे सांगावेसे वाटते, की 'ज्ञानमेव परा शक्ति:'। ज्ञान हीच सर्वोत्तम शक्ती आहे. हे ज्ञान आमच्यात वास करते. त्यामुळे, मला हाताळताना थोडीशी काळजी घेतलीत, तर मला खूप आनंद होईल. मी चांगल्या स्थितीत राहीन व इतरांनाही उपयोगी पडेन.

सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मीही डिजिटल होत आहे. मला मोबाइलमध्ये, संगणकावर 'इ-बुक'च्या स्वरूपात वाचता येते. माझ्या या काळानुसार बदलत्या रूपाची भुरळ तुमच्या नव्या पिढीला पडत आहे. तुमचा वाचनाचा छंद कायम टिकावा, हीच माझी इच्छा आहे. त्यामुळे, तुम्हांला काहीतरी सांगण्याची, तुमच्यासाठी काही करण्याची, तुमच्या जवळ राहण्याची माझी इच्छा पूर्ण होईल आणि आपली मैत्री सदैव टिकून राहील.
अच्छा, खूप वेळ झाला, अभ्यास करा बरं ..."

**किंवा**

(2) **वैचारिक लेखन**

**युग संगणकाचे**

एकविसावे शतक हे विज्ञान-तंत्रज्ञानाचे आणि संगणकाचे युग आहे, असे म्हटले जाते. आधुनिक विज्ञानाच्या साहाय्याने माणसाने अनेक शोध लावले आणि प्रगतिपथावर येऊन पोहोचला. त्यातील आपल्या सर्वांना परिचयाचा असलेला शोध म्हणजे संगणकाचा शोध. सन 1837 साली चार्ल्स बॅबेज यांनी पहिल्या यांत्रिक संगणकाचा शोध लावला. कालानुरूप त्याच्यात अनेक सुधारणा होत गेल्या आणि आजच्या युगात जवळजवळ सगळ्याच क्षेत्रात संगणकाचा वापर अनिवार्य झाला आहे.


संगणक या यंत्राने आपली अनेक कामे अतिशय सोपी केली आहेत. बँकेचे व्यवहार, शासकीय कामे, अभियांत्रिकी-वैद्यकीय क्षेत्र, शाळा, महाविद्यालये अशा सर्वच महत्त्वाच्या क्षेत्रांत संगणक प्रणालीचा वापर आवश्यक झाला आहे. पैशांचे व्यवहार आणि हिशोबाची कामे संगणकामुळे सोपी झाली आहेत. इंटरनेटच्या शोधामुळे तर आपल्याला हव्या असलेल्या कोणत्याही विषयाची माहिती तत्काळ आपल्याला संगणकाच्या माध्यमातून मिळू शकते. त्यामुळे मानवाला ज्ञानाची दालने खुली झाली आहेत. इ-मेल, सोशल मीडिया यांसारख्या गोष्टींचा वापर करून एकमेकांबरोबर माहितीची देवाणघेवाण करणे आणि संपर्क साधणे दोन्ही सहज शक्य झाले आहे. संगणक ही आजच्या युगाची क्रांती आहे असं म्हटलं तरी ते चुकीचं ठरणार नाही. संगणकामुळे आपली कामे लवकर होतात. कोणतेही काम तत्काळ आणि अचूक करता येत असल्यामुळे मानवी जीवनामध्ये संगणक काळाची गरज बनला आहे. कोरोनाच्या काळात तर लॉकडाऊनमुळे शिक्षण, ऑफिसची कामे, मीटिंग्ज या सगळ्याच गोष्टींसाठी संगणक अतिशय महत्त्वाचा ठरला आहे.

पण संगणकाचे अनेक उपयोग असले, तरी त्याचे काही तोटेदेखील आहेत. संगणकावर सतत काम केल्यामुळे अनेक लोकांना पाठदुखी, डोळ्याचे विकार जडत आहेत. संगणकावर काम करता करता माणसे अनेक वेळा संगणकाच्या आहारी गेल्याचे दिसून येते आहे. लहान मुले तसेच तरुण मुले अनेक वेळा दिवसभर कम्प्यूटर गेम खेळण्यात मग्न होतात. लहान मुले तर मैदानी खेळ विसरू लागली आहेत. त्या सगळ्याचा त्यांच्या डोळ्यांवर, शरीरावर, आरोग्यावर परिणाम होत आहे. संगणकामुळे दूरदूरच्या माणसांशी बोलणे सोपे झाले असले, तरी त्यामध्येच अडकून पडल्यामुळे घरातली माणसे, मित्रमंडळी यांच्याशी संवाद तुटला आहे. एक प्रकारचा दुरावा निर्माण होताना दिसत आहे. सोशल मीडियाचा दुरुपयोग करणे, सोशल मीडियाचा वापर करून खोटी माहिती पसरवणे, लोकांना भडकवणे अशा गोष्टी सर्रास घडताना दिसत आहेत. अनेक वेळा दहशतवादी कारवाया करण्यासाठी सुद्धा संगणकाचा वापर केला गेल्याचे आढळले आहे. सायबर गुन्हे, अफरातफरी घडून येताना दिसत आहेत.

शेवटी संगणक हे उपकरण आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. त्याची क्षमता कितीही जास्त असली तरी त्याला स्वत:चा मेंदू नाही. त्यामुळे योग्य काय अयोग्य काय हे संगणक स्वत: ठरवू शकत नाही, ते संगणक वापरणाऱ्या माणसावर अवलंबून असते. म्हणूनच मानवाने आपली सदसद्विवेकबुद्धी आणि नैतिकता वापरून संगणकाचा वापर कुठल्या गोष्टीसाठी आणि किती प्रमाणात करायचा हे ठरवणे जास्त महत्त्वाचं आहे. जर संगणकाचा वापर समाजाच्या, देशाच्या हितासाठी आणि विधायक कामांसाठी केला गेला, तर संगणक हा मानवी जीवनासाठी नक्कीच वरदान ठरेल.

Sample Content

# SSC Champions Ki A–Z Tayyari Ke Liye




SAMPLE CHAPTER

## A Collection of Board Questions with Solutions

Chapter-wise, topic-wise and year-wise SSC Board questions that will help you *crack the board code*

- All subjects
- Exam-oriented solutions

## SSC 54 Question Papers and Activity Sheets with Solutions

Train for the D-Day with this kit of mock tests designed just like the SSC Board papers

- Practice papers
- Solved past papers
- Solutions

SAMPLE CHAPTER







SAMPLE CHAPTER

## ProLingo Series (Grammar and Writing Skills)

Your best bet to lock 40 out of 80 marks in English, Hindi and Marathi

- Textbook and practice exercises
- Explanations
- Answers
- Past Board questions
- Examples

## Important Question Bank (IQB)

Your superhero for stress-free last minute exam preparation

- Most important questions
- Exam-ready answers
- Solved previous board papers
- Time management tools

SAMPLE CHAPTER




**Visit Our Website**

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning

**Address:**
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org

VISIT OUR STORE

TARGET AMAZON STORE

TARGET FLIPKART STORE